॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.०१**

जळगाव दि. १० (      ) विद्यार्थी दशेत `असे का ?` हा प्रश्न सातत्याने विचारत रहा, त्यामुळे ज्ञानाचा विस्तार होईल आणि ध्येयपूर्ती पर्यंतचा प्रवास यशस्वी होईल असे प्रतिपादन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी संशोधन वृध्दी कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने संलग्नित महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृध्दी जोपासण्यासाठी उन्हाळी कार्यशाळा (समर वर्कशॉप) आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे हे तिसरे वर्ष होते. १ जून रोजी सुरु झालेल्या या दहा दिवसीय कार्यशाळेचा समारोप सोमवारी कुलगुरु प्रा.पाटील यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी नवी दिल्लीच्या विज्ञान प्रसार विभागाचे ज्येष्ठ संशोधक टी.व्ही.व्यंकटेश्वरन, श्रीमती भटनागर, जळगावचे उद्योजक छबीराज राणे हे उपस्थित होते.

कुलगुरु प्रा.पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये पदवी स्तरावर संशोधनाची आवड निर्माण व्हावी यासाठी गेल्या तीन वर्षांपासून ही कार्यशाळा घेतली जात आहे. या कार्यशाळेतून मिळालेले प्रोत्साहन कायम लक्षात ठेवा आणि उत्तम शास्त्रज्ञ होण्यासाठीचे ध्येय निश्चित करा. त्यासाठी कठीण परिश्रमाची तयारी ठेवा असे आवाहन करुन त्यांनी आई-वडिलांची जाणीव विद्यार्थ्यांनी कायम ठेवावी असेही सांगितले. डॉ.व्यंकटेश्वरन यांनी विज्ञानात नाविन्यपूर्णतेला महत्व आहे. त्यामुळे नवी दृष्टी बाळगा असे आवाहन केले. छबीराज राणे यांनी सगळया गोष्टींकडे सकारात्मक पाहिल्यास यश मिळते असे प्रतिपादन केले.

प्रारंभी प्रा.एच.एल.तिडके यांनी प्रास्ताविकात कार्यशाळेचा आढावा घेतला. आदिति हिंदुजा, प्रियंका अवाड, काजल आठवाणी, कृष्णा बोरसे, दिव्या रावंदळे आणि गिरीष पाटील या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेविषयीच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. प्रा.राम भावसार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले तर आभार डॉ.एच.एल.तिडके यांनी मानले.

---

**बातमी क्र.०२**

जळगाव.१० (      ) विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातील एम.ए. एम.ए.एम.सी.जे. या वर्गाचा अंतिम वर्षाचा निकाल शंभर टक्के लागला असून यात विद्यार्थिनींनी बाजी मारली आहे. या निकालात ॲमीअबिगेल चौधरी हिने प्रथम तर कविता ठाकरे व मिनल खैरनार या विद्यार्थिनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकविला आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील जनसंवाद आणि पत्रकारिता विभागात एम.ए.जनसंवाद आणि पत्रकारिता (एम.ए.एम.सी.जे.) या दोन वर्षीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा निकाल विद्यापीठातर्फे जाहिर करण्यात आला. यात ॲमीअबिगेल संजय चौधरी ही विद्यार्थिनी सर्वाधिक गुण मिळवून विभागातून प्रथम आली तर कविता ठाकरे या विद्यार्थीनीने दुसरा क्रमांक तर मिनल खैरनार या विद्यार्थिनीने तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

एम.ए.एम.सी.जे.या वर्गाचा निकालात एकुण पाच विद्यार्थी मेरिटमध्ये आले असून आठ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. तर उर्वरित विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीमध्ये यश संपादन केले आहे. एकुण निकालाच्या टक्केवारीत दरवर्षीप्रमाणे विभागाने उच्चांक स्थापीत केला आहे. या विभागातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, रेडिओ, जाहिरात संस्था, शासकीय, निमशासकीय व खाजगी जनसंपर्क कार्यालयात विविध पदांवर कार्यरत आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, परीक्षा व मूल्यमापन संचालक बी.पी. पाटील, कुलसचिव बी.बी.पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक डॉ.अनिल चिकाटे, विभागप्रमुख डॉ.सुधीर भटकर, डॉ.विनोद निताळे, डॉ.गोपी सोरडे, डॉ.सोमनाथ वडनेरे आदींनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९      दिनांक : १० जून, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
(डॉ.सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी